गोदातीर समाचार दि. 02/08/2022

# वजिराबाद पोलिसांकडून १३ तलवारी, आठ खंजर जप्त; एकास अटक

**नांदेड-** शहरात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती शांततेत सुरू असतानाच वजिराबाद पोलिसांना अवैध शस्त्रांचा मोठा खजाना सापडला. उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) चंद्रसेन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार यांच्या गुन्हे शोध पथकाने कारवाई करत १३ तलवारी आणि आठ खंजर जप्त करत एकाला अटक केली आहे. ही कारवाई सोमवारी दिनांक एक ऑगस्ट रोजी दुपारी दोन वाजता करण्यात आली.

पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे, अतिरिक्त पोलीस अधिक्षक विजय कबाडे, निलेश मोरे यांनी जिल्ह्यातील गुन्हेगारीस आळा घालण्याच्या उद्देशाने अभिलेखावरील गुन्हेगारांच्या याद्या अद्यावत करुन त्यांच्याविरुध्द कडक प्रतिबंधक कार्यवाही करणे, अवैध धंद्याविरुध्द कारवाया करणे तसेच अवैध शस्त्र व शस्त्रसाठा बाबतची माहीती काढुन त्यावर कारवाया करण्याचे आदेशीत केले आहे. सदर आदेशाप्रमाणे पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार, दत्तात्रय निकम यांनी पोलीस ठाणे वजिराबाद हद्दीत वरिष्ठांच्या सुचनेनुसार कारवाया करण्याच्या सुचना गुन्हे शोध पथकातील अधिकारी व अंमलदार यांना दिल्या होत्या.



गुन्हे शोध पथकाचे अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार, अंमलदार गजानन किडे, मनोज परदेशी, शरदचंद्र चावरे, संतोष बेलुरोड, शेख ईम्रान, रमेश सुर्यवंशी, महिला अंमलदार शुभांगी कोरेगावे यांच्या पथकाने एक ऑगस्ट रोजी मिळालेल्या माहीतीवरुन लंगरसाहेब गुरुद्वारा परिसरामध्ये चरणसिंघ हॅन्डीक्रॉफ्ट दुकान क्र. ०६ मध्ये दोन वाजता छापा मारला असता छाप्या दरम्याण एकुण १३ तलवारी व आठ खंजर असा २४ हजार रुपयाचा किमंती ऐवज मिळुन आल्याने तो पंचासमक्ष जप्त करुन ताब्यात घेण्यात आला. सदर प्रकरणी सरकारतर्फे गजानन किडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलीस ठाणे वजिराबाद येथे शस्त्र अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास एपीआय संजय निलपत्रेवार करत आहेत.